# महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

## महासमादेशक होमगार्ड महाराष्ट्र राज्य

जुने सचिवालय विस्तार भवन, 3 रा मजला, म.गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई - 400 032.
दूरध्वनी क्र.- 022-22843667, 22856435 Email ID - hqadm03@gmail.com

**जा. क्रमांक :मस/कार्या 03/** १४३० **दिनांक:** 09 JUL 2024

प्रति
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य,

(लक्षवेध- अप्पर पोलीस महासंचालक कायदा व सुव्यवस्था महाराष्ट्र राज्य )

विषय :- होमगार्ड भरती प्रक्रिया करीता साधन सामग्री व आवश्यक कर्मचारी वर्ग उपलब्ध करणेबाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, होमगार्ड संघटनेच्या आस्थापनेवरील 34 जिल्हयात एकुण 9700 इतका मानसेवी होमगार्डचा अनुशेष आहे. सदर अनुशेष भरुन काढण्याकरिता भरती प्रक्रिया दि. 16.8.2024 पासून जिल्हा स्तरावर आयोजित करण्यात येत आहे.

1. सदर भरती प्रक्रिया आयोजित करताना होमगार्ड भरतीशी संबंधित आवश्यक साहित्य जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे कार्यालयाकडून नोंदणी प्रक्रिया पार पडेपर्यंत उसनवारी तत्वावर उपलब्ध करुन देण्यास तसेच आवश्यक कर्मचारी वर्ग उपलब्ध करण्यास आपले अंतर्गत सर्व पोलीस घटकांना कृपया सुचना देण्यात याव्यात.

2. या विभागाचे परिपत्रक दि. 9.7.2024 नुसार होमगार्ड निवड समितीसाठी पोलीस निरिक्षक दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या पोलीस अधिकारी यांची नियुक्ती करण्याबाबतच्या सुचना सर्व पोलीस घटक कार्यालयांना कृपया देण्यात याव्यात.

3. दि. 16.8.2024 पासून भरती प्रक्रियेची कार्यवाही पुर्ण झाल्यावर आपल्या अधिनस्त राज्यातील पोलीस प्रशिक्षण केंद्रात माहे सप्टेंबरच्या पहिल्या आठवडयापासून होमगार्डना 35 दिवसांचे प्राथमिक प्रशिक्षण उपलब्ध करुन देण्यात यावे अशी विनंती आहे.

Ritesh

( रितेश कुमार )
महासमादेशक
होमगार्ड महाराष्ट्र राज्य